# समाज प्रबोधन पत्रिका

समाज प्रबोधन संस्थेचे प्रकाशन
आय.एस.एस.एन. ०९७३-२८४५

वर्ष ५७
अंक २२८
ऑक्टो.-नोव्हें.-डिसें. २०१९

अनुक्रम

| | | | |
|---|---|---|---|
| १. | चिनी क्रांतीची ७० वर्षे | अशोक चौसाळकर | ३ |
| २. | ब्रेक्झिट: युरोपीय युनियन दुभंगण्याची कारणमीमांसा, भवितव्य आणि आव्हाने | सुरेन्द्र हरिश्चंद्र जाधव | १२ |
| ३. | महान रशियन कवी : अलेक्सांद्र पुश्किन (१७९९-१८३७) | मेघा पानसरे | २२ |
| ४. | सिंचन प्रकल्पपूर्तीतील विलंब, प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनातील त्रुटी आणि समस्या | ज्ञानदेव तळुले, महादेव देशमुख, विजय ककडे | २९ |
| ५. | महाराष्ट्रातील समाजवादी पक्षांचं राजकारण | शैलेंद्र खरात | ५१ |
| ६. | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१९-बदलती सामाजिक समीकरणे | विवेक घोटाळे, मुक्ता कुलकर्णी | ६५ |
| ७. | निवडणूक आणि कल्याणकारी योजनेचे राजकारण | केदार देशमुख | ७४ |
| ८ | 'तुघलक': इतिहास, राजकारण आणि समकालीनत्व | शशांक माने | ८२ |
| ९. | बीड जिल्हा : संस्कृती आणि कोरीव लेख | अशोक चौसाळकर | ८७ |
| ☐ | चर्चा | | |
| १० | दलित ओबीसींची मोट आणि डॉ. आंबेडकर | संजय दाभाडे | ८९ |
| ☐ | पुनर्वाचन | | |
| ११. | इतिहास डिंडिमाचा घोष | वासुदेवशास्त्री खरे | ९१ |

# 'तुघलक': इतिहास, राजकारण आणि समकालीनत्व

† शशांक माने

साठ-सत्तरच्या दशकात भारतीय भाषांमध्ये काही नाटककारांनी वैशिष्ट्यपूर्ण नाटके लिहिली. मराठीत विजय तेंडुलकर, बंगालीत बादल सरकार, हिंदीमध्ये मोहन राकेश तर कन्नडमध्ये गिरीश कर्नाड यांचा अग्रक्रमाने विचार करावा लागेल. भारतीय रंगभूमीवर त्यांनी विविध प्रयोग केले. सामाजिक प्रबोधन व वर्तमानकालीन स्थितीवर भाष्य करणे हाच उपरोक्त नाटककारांच्या लिखाणाचा मुख्य उद्देश होता. विजय तेंडुलकर, बादल सरकार व मोहन राकेश हे नाटककार वास्तववादी नाटकं लिहीत होते, आपल्या नाटकातून सामाजिक भान जपत ते तत्कालीन पार्श्वभूमीवर महत्त्वपूर्ण प्रश्न मांडत होते. कर्नाडांची नाटके मात्र लोककथा, मिथकं, पुराणकथा व इतिहासावर आधारित होती. कर्नाडांचं सर्वात गाजलेले नाटक म्हणजे 'तुघलक' ('तुघलक' त्यांनी १९६४,) 'ययाती' (१९६१) या कर्नाडांच्या पहिल्या नाटकाप्रमाणेच हे नाटकही यशस्वी झालं.

'तुघलक' या नाटकाचा विषय आपल्याला कसा सुचला याविषयी खुलासा करताना एका मुलाखतीत कर्नाड म्हणतात, 'ययाती'च्या यशानंतर आपण ऐतिहासिक नाटक लिहावं असं वाटू लागलं. आपल्या साहित्यिक मित्रांनीही आपल्याला ऐतिहासिक नाटक लिहिण्याचा आग्रह धरला. त्यांच्या मते, आजवर भारतात ऐतिहासिक नाटकं फारशी कुणी लिहिली नव्हती.[१] कर्नाडांनी मग भारतीय इतिहासाचं वाचन सुरू केलं, अगदी मोहोंजोदडो पासून त्यांनी इतिहासाचा अभ्यास सुरू केला. चौदाव्या शतकापर्यंत आल्यानंतर त्यांना त्यांच्या नाटकाचा विषय सापडला. मुहंमद बिन तुघलक इ. स. १३२५ ते १३५१ पर्यंत म्हणजे जवळजवळ सव्वीस वर्षे हिंदुस्थानचा सुलतान होता. तुघलकची कारकीर्द अनेक गोष्टींमुळे वादग्रस्त ठरली. काही इतिहासकारांच्या मते, तो अतिशय हुशार होता तर काही इतिहासकार आतापर्यंतचा सर्वात मूर्ख सुलतान म्हणून त्याची संभावना करताना दिसतात. अशा महत्त्वपूर्ण ऐतिहासिक व्यक्तिरेखेवर कर्नाडांनी नाटक लिहायचं ठरवलं, तुघलक त्यांना मनापासून आवडला होता.

'तुघलकी कारभार' व 'वेडा महंमद' हे मराठीतील प्रसिद्ध वाक्प्रचार तुघलक वरूनच आलेले आहेत. 'तुघलकी कारभार' म्हणजे मनमानी कारभार/अनिर्बंध कारभार आणि एखाद्याचा वेडेपणा/मूर्खपणा अधोरेखित करण्यासाठी 'वेडा महंमद' या अर्थाने हे

† सहाय्यक प्राध्यापक, इंग्रजी विभाग, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती. भ्रमणध्वनी : ९७६३८६५५५६

वाक्यप्रचार वापरले जातात. तुघलकच्या अनेक वादग्रस्त निर्णयांपैकी दोन निर्णय अतिशय वादग्रस्त ठरले ज्यामुळे हे वाक्यप्रचार रूढ झाले. एक म्हणजे तुघलकने दिल्लीहून 'दौलताबाद' येथे राजधानी हलवण्याचा निर्णय घेतला व दुसरा निर्णय म्हणजे त्याने चलनातील चांदीची नाणी रद्द करून तांब्याची नाणी व्यवहारात आणली. या दोन्ही निर्णयांमुळे दरबारातील सरदारांचा आणि उमरावांचा रोष जसा त्याला पत्करावा लागला तसाच सामान्य रयतेच्या असंतोषालाही त्याला सामोरे जावे लागले व त्यातूनच तुघलकचा ऱ्हास झाला. सर्वजण त्याच्या विरोधात गेले परंतु तुघलकने आपले निर्णय रेटून नेले.

'तुघलक' हे पारंपरिक नाटक नसून आधुनिक नाटक आहे. नाटकाची मांडणी अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे. पारंपरिक नाटक हे 'अंकात' तथा 'दृश्यांमध्ये' विभागलेले असते परंतु 'तुघलक' मध्ये केवळ दृश्ये आहेत. नाटक हे १३ दृश्यांमध्ये विभागलेले आहे. त्यातील पहिली सहा दृश्ये दिल्लीमध्ये घडतात आणि शेवटची सहा दृश्ये दौलताबाद मध्ये घडतात. मधलं एक, सात क्रमांकाचं दृश्य हे दिल्ली -- दौलताबाद या प्रवासातील आहे. पहिल्या सहा दृश्यांमध्ये आपल्याला 'Court Politics' (दरबारातील राजकारण) म्हणजे सुलतानाची कट कारस्थानं, दडपशाही व विश्वासघातकीपणा हे सर्व पाहायला मिळते. सुरुवातीच्या काही दृश्यात तुघलक आपण कसे न्यायप्रिय आहोत, हे जनतेच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न करताना दिसतो. विष्णुप्रसाद नावाच्या ब्राह्मणाची जमीन बादशहाच्या सैनिकांनी अवैधरित्या हडप केलेली आहे आणि या ब्राह्मणाने त्या विरुद्ध तक्रार केली आहे. न्यायाधीश ब्राह्मणाच्या बाजूने निकाल देतात व बादशहाला शिक्षा सुनावतात! त्यावर सगळे लोक अवाक् होतात पण तुघलक न्यायाधीशांनी दिलेली शिक्षा मान्य करतो व नुकसान भरपाई देण्याचे कबूल करतो. यातून तुघलक हा एक प्रकारे जनतेला आश्वस्त करू इच्छितो की हे लोकांचे राज्य आहे, कायद्याचे राज्य आहे. त्याच्या राज्यात कायद्यासमोर सगळे सामान आहेत आणि याला बादशहासुद्धा अपवाद नाही. पण मौलवींना हे काही रुचत नाही, प्रजा सनातनी आहे. एका हिंदूने बादशहा विरुद्ध तक्रार करावी ही गोष्टच त्यांना सहन होत नाही.

बादशहाने हिंदूवरील 'जिझिया' कर रद्द केलेला आहे हे सुद्धा त्यांना आवडत नाही. सुलतानाने कुराणातील वचनांप्रमाणे राज्यकारभार करावा अशी त्यांची इच्छा असते पण तुघलक हा काळाच्या पुढे चालणारा राजा होता, आपले राज्य कोणत्याही विशिष्ट धर्मीयांसाठी नसून ते सर्व धर्मीयांसाठी आहे हे त्याला दाखवून द्यायचे होते. परंतु, यात ही तो अपयशी होतो. राज्यातील हिंदू सुद्धा त्याच्यावर संशय घेतात! आपल्यावरील कर का रद्द केले व आपल्याला सुलतान एवढी चांगली वागणूक का देत आहे, हेच त्यांना कळत नाही. यामागे सुलतानाचा काही डाव तर नसेल ना! अशी शंका त्यांना येत असते. सुलतानाने सत्तेसाठी आपल्या वडिलांना आणि भावाला कसे ठार मारले याची सुद्धा राज्यात चर्चा चालू असते. एकूणच, तुघलकबद्दल लोक अनुकूल नाहीत. त्याच्या राज्यकारभारावर खूश नाहीत आणि यातच भर म्हणून तो आपला निर्णय जाहीर करतो की लवकरच तो दिल्लीहून दौलताबाद येथे राजधानी हलवणार आहे.

राजधानी हलवण्यामागचं खरं कारण वेगळंच आहे. परकीय आक्रमणांपासून बचाव करण्यासाठी आपण राजधानी हलवतो आहोत असं तुघलक सर्वांना सांगतो; पण खरंतर त्याला हिंदू-मुस्लीम ऐक्य घडवून आणायचं आहे! दौलताबाद हा हिंदू बहुल भाग आहे. या ठिकाणी राजधानी हलवून तो दिल्लीतील सर्व मुस्लीम प्रजेला तिथे नेऊ इच्छितो; ज्यामुळे

हिंदू व मुस्लीम एकत्र राहतील व त्यांच्यामध्ये सलोखा निर्माण होईल. तुघलक आदर्शवादी आहे म्हणून तो हा निर्णय घेतो. तुघलकचे विचार, निर्णय चांगले असतात परंतु त्यांची अंमलबजावणी नीट होत नाही. इतिहासात आजवर अनेक शासनकर्त्यांनी आपली राजधानी बदलली. शिवाजी महाराजांनी राजगडाहून रायगड येथे राजधानी नेली. १८ व्या शतकात रशियाच्या झारने मॉस्कोहून त्याची राजधानी सेंट पीटरबर्ग येथे हलवली तर १९११ साली ब्रिटिशांनी कलकत्त्याहून दिल्लीला राजधानी हलवली. राजधानी हलवताना फक्त कार्यालयं व अधिकारी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलवली जातात. राज्यकारभाराच्या सोयीसाठी अशाप्रकारे राज्याचं केंद्र बदललं जातं. परंतु राजधानी हलवताना तेथील सर्वच्या सर्व लोकांना स्थलांतरित केले जात नाही. तुघलकने दिल्लीवासियांना विस्थापित करण्याचा जो वेडेपणा केला तो लोकांना मान्य नव्हता. पण बादशहाच्या मर्जीपुढे कुणाचं चालणार!

प्रथमदर्शनी न्यायप्रिय, लोकांचे हित चिंतणारा, व प्रजेच्या हितासाठी झटणारा राजा म्हणून तुघलक आपल्याला दिसतो. परंतु हळूहळू त्याची कपट कारस्थाने, क्रूरपणा व धूर्तपणा नाटककार आपल्यासमोर मांडतो. तुघलकला विरोध मान्य नाही, त्याला टीका सहन होत नाही. त्याच्याविरुद्ध बोलणाऱ्या सगळ्यांचाच तो काटा काढतो अगदी शाही इमामाला - धर्मगुरूलाही तो सोडत नाही. शेख इमाम जे उघड उघड तुघलकवर टीका करत असतात, तुघलक त्यांचा खून करवतो. तुघलक इतका बेरकी आहे की त्याच्याविरुद्ध कटकारस्थान करणाऱ्या सरदार व उमरावांवर तो बारीक नजर ठेवून आहे व वेळ आल्यावर अतिशय निर्दयपणे तो त्यांची हत्या करतो. तुघलकचे सरदार तुघलकच्या मनमानी कारभाराला कंटाळलेले असतात. अनेकप्रकारे समजावूनसुद्धा तुघलक कुणाचंच ऐकत नाही व तो आपले निर्णय इतरांवर लादत असतो म्हणून नाईलाजाने ते बादशाहाविरुद्ध बंड करायचं ठरवतात परंतु त्यात यशस्वी होत नाहीत.

नाटकातील मधलं दृश्य, दृश्य क्रमांक सात, दिल्ली ते दौलताबाद या रस्त्यावर घडताना दिसते. त्यात लोकांचे कसे हाल होत आहेत, हे प्रामुख्याने कर्नाडांनी दाखवलं आहे. अनेकजण प्रवासादरम्यान मरतात. इतक्या दूरवर पायी चालताना लोकांना खूप त्रास होतो. लहान मुलं, स्त्रिया व वयोवृद्ध दूरवर चालू शकत नाही. सुलतानाचे सैनिक त्यांना अजिबात उसंत घेऊ देत नाहीत. ठरलेल्या वेळेत चालायचेच व कुणीही मागे राहायचे नाही असा हुकूमच तुघलकने काढला आहे. या दृश्यात एक स्त्री आपल्या आजारी मुलावर इलाज करण्यासाठी जवळच्या गावी जात असताना सैनिक तिला अडवतात, त्या मुलाला वेळेत उपचार मिळत नाहीत, परिणामी त्याचा मृत्यू होतो. तुघलकचा जुलमी व तऱ्हेवाईक कारभार यातून अधोरेखित होतो.

शेवटच्या सहा दृश्यात नाटककार आपल्याला दौलताबादमधील स्थिती दाखवतो. यामध्ये भर आहे तो तुघलकच्या दुसऱ्या निर्णयावर - चलन बदलण्यावर. चांदीची नाणी बंद करून तांब्याची नाणी चलनात आणल्यावर राज्याची अर्थव्यवस्था ढासळते. घरोघरी लोक सहज नकली नाणी तयार करतात व त्यातून महागाई वाढते. अशातच दौलताबादमध्ये, नवीन राजधानीत, दुष्काळ पडतो व प्रजा अन्नान्न करून मरत आहे. दिल्लीहून लोकांचे या डोंगराळ भागात मन रमत नाही, त्यांना आपल्या घरची व दिल्लीची आठवण येत राहते. त्यानंतर पडलेल्या दुष्काळामुळे ते पार खचून गेलेले आहेत. परिस्थिती पूर्ण हाताबाहेर गेली आहे व आपले निर्णय सपशेल चुकलेले आहेत याची उपरती

तुघलकला होते व आता परत तो दौलताबादहून दिल्लीला राजधानी नेण्याचं ठरवतो. या सर्व घटनांदरम्यान तुघलक हळूहळू त्याच्या सर्व जवळच्या, विश्वासू माणसांना विविध प्रकारचे संशय घेऊन ठार मारतो. त्याची सावत्र आई सुद्धा त्याच्या रोषाला बळी पडते व जीव गमावते. नाटकाच्या शेवटी तुघलक अगदी एकाकी व हतबल झालेला दिसतो.

'तुघलक' हे जसं ऐतिहासिक नाटक आहे तसंच ते राजकीयही आहे. इतिहासाचा वापर त्याकाळातील राजकीय परिस्थितीवर भाष्य करण्यासाठी काही लेखक करतात. 'तुघलक' मधून कर्नाड समकालीन राजकीय परिस्थितीवर प्रकाश टाकतात. अनेक समीक्षकांच्या मते 'तुघलक' हे नेहरूंच्या कारकिर्दीवर टीका करण्यासाठी लिहिलेलं नाटक आहे. नेहरूंचा काळ हा काही राजकीय विश्लेषकांच्या मते भ्रमनिरास (disillusionment) करणारा काळ होता. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतातील गरिबी नाहीशी होईल, बेरोजगारी मिटेल, शेतीचे प्रश्न सुटतील व खऱ्या अर्थाने भारताचा विकास होईल असं लोकांना वाटलं होतं; पण स्वातंत्र्य मिळून एक दशक लोटलं तरी भारताचे चित्र फारसे बदलले नव्हते. गोरे लोक सत्तेतून जाऊन भारतीय सत्तेत आले होते एवढाच काय तो बदल!

तुघलकप्रमाणे नेहरूही आदर्शवादी होते. हिंदू-मुस्लीम ऐक्याचे पुरस्कर्ते होते. भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे व तो राज्यघटनेनुसार चालतो हे बिंबवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. धार्मिक मूलतत्त्ववादाच्या विरोधात ते होते. पण भारतात खरोखरच हिंदू-मुस्लीम ऐक्य झालं का? जातीय व धार्मिक सलोखा वाढला का? या प्रश्नांची उत्तरं खात्रीलायकरित्या देणे अवघड आहे. म्हणून अपर्णा धारवाडकर यांच्या मते, 'तुघलक' हे नाटक राजकीय आहे[२] व कर्नाडांनी सरळ सरळ नेहरूंची तुलना तुघलक बरोबर केली आहे. परंतु, 'तुघलक' हे पूर्णतः Political Allegory (राजकीय रूपकात्मक) नसून तुघलक आणि नेहरूंच्या मध्ये काही गोष्टीत साम्य दिसतं. आशिष सेनगुप्तांच्या मते तुघलकप्रमाणे नेहरूनांही आपण इतिहास घडवीत आहोत याची सारखी जाणीव असायची.[३] तुघलकने 'बरानी' नावाच्या इतिहासकाराला आपल्याजवळच ठेवून घेतले होते व तुघलक त्याला हवा तसा इतिहास त्याच्याकडून लिहून घेण्याचा प्रयत्न करत होता. तुघलकप्रमाणे नेहरूंनाही वाटे की आपल्या देशातील लोकांमध्ये प्रचंड शक्ती, ऊर्जा व बुद्धिमत्ता आहे व आता भारताचं भविष्य घडवण्याची ताकद आपल्यात आहे. तुघलकला व नेहरूंना आपल्या कारकिर्दीत काहीतरी अचाट करायचे होते.

भारतातील राजकारणामध्ये अनेक नेते तुघलक प्रमाणे वागले व वागत आहेत. आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधींची तुलना तुघलकशी होऊ लागली व त्याही काळात 'तुघलक' लोकांना समकालीन वाटू लागलं. सद्यस्थितीत भाजपप्रणित सरकार व पंतप्रधान मोदीही तुघलक सारखेच वागत आहेत. मोदींचा नोटाबंदीचा निर्णय हा तुघलकच्या चांदीचे चलन बंद करण्याच्या निर्णयाची आठवण करून देतो. नोटाबंदीमुळे सर्वसामान्य लोकांना त्रासच सहन करावा लागला व अनेकांचा त्यात नाहक बळी गेला. नोटाबंदीमागे मोदी सरकारचा हेतू चांगला होता. देशातील काळापैसा बाहेर येईल, भ्रष्टाचार थांबेल वगैरे. परंतु त्याची अंमलबजावणी नीट झाली नाही. भारतीय रिजर्व्ह बँकेचे माजी प्रमुख रघुराम राजन व इतर अनेक अर्थतज्ज्ञांच्या मते, नोटाबंदीचा निर्णय साफ फसला व त्यामुळे देशाला अपेक्षित फायदा झालाच नाही. तसेच विरोधकांवर पाळत ठेवणे, वेळप्रसंगी कारवाईची भीती दाखवून विरोध मोडून काढणे असे प्रकार सध्या देशात चाललेले दिसतात जे तुघलकने अवलंबिलेल्या दडपशाही सारखेच

आहेत. नुकताच संसदेत पास झालेलं, माहिती अधिकारात सुधारणा केलेलं विधेयक (RTI Amendment Bill) हे सरकारच्या हेतूवर संशय निर्माण करणार आहे. या सुधारित कायद्यानुसार कुणीही सहजपणे सरकारबद्दल माहिती मिळवू शकत नाही. माहिती द्यायची का नाही हेच मुळात सरकारने आपल्या हातात ठेवले आहे. अशाप्रकारच्या अनेक निर्णयांमुळे मोदी सरकार विरोधकांच्या टीकेचे लक्ष बनते. 'Absolute power corrupts absolutely' या इंग्रजी उक्तीप्रमाणे अनिर्बंध, निरंकुश सत्ता प्रजेसाठी कशी घातक ठरते, हेही या नाटकातून कर्नाडांना दाखवायचे आहे. एका पक्षाला राक्षसी बहुमत मिळाल्यामुळे व विरोधक नावालाच उरल्यामुळे आपली वाटचाल तुघलकी कारभाराच्या दिशेने तर चालली नाही ना असा सद्यस्थितीत अनेकांना संशय येतो. एकूणच, 'तुघलक' ही अभिजात कलाकृती आहे. १९६४ साली लिहिलेलं हे नाटक कालातीत आहे. आजही हे नाटक समकालीनच वाटतं. तुघलकसारखे शासनकर्ते सर्व काळात व जगातील सर्व देशात सापडतील.

**संदर्भ:**


१. Soul talk with Girish Karnad. YouTube, uploaded by PB Archives, 10 June 2019, www.youtube.com/watch?v=laL7oWWuLGI.

२. Dharwadker, Aparna. Historical Fictions and Postcolonial Representation : Reading Girish Karnad's Tughlaq. PMLA, vol. 110, no. 1, 1995, pp. 43-58. JSTOR, www.jstor.org/stable/463194.

३. Sengupta, Ashis. Plays as Political Allegories: "The Ride Down Mount Morgan' and "Tughlaq.' The Arthur Miller Society Newsletter, vol. 9, 2004, pp. 14-15. JSTOR, www.jstor.org/stable/43965613. Three Modern Plays OUP New Delhi 1989.


◆

## साभार पोच

- भोळे भास्कर लक्ष्मण (२०१९), आधुनिक महाराष्ट्रातील विचारवंत, युनिक फौंडेशन, पुणे
- सूर्यवंशी उमेश मुरलीधर (२०१९), निर्भय, सुषमा सूर्यवंशी, कोल्हापूर
- पद्मरेखा धनकर, (२०१९), फक्त सैल झालाय दोर, ग्रंथाली, मुंबई
- मोहन व सुजाता अंत्रोळीकर, समर्पण - देशभक्त डॉ. कृ. भि. अंत्रोळीकर स्मृतिग्रंथ, प्रस्तावना डॉ. गो.मा.पवार, डॉ. अंत्रोळीकर स्मृतीन्यास. सोलापूर
- फडके य. दि., भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील मुसलमान (२०१९), नवी आवृत्ती, प्रस्तावना डॉ. अशोक चौसाळकर, परिवर्तन प्रकाशन, सोलापूर
- रा. ना. चव्हाण (२०१९), न्यायमूर्ती रानडे, डॉ. भांडारकर आणि प्रार्थनासमाज, प्रस्तावना डॉ. राजा दीक्षित, रमेश चव्हाण, रा. ना. चव्हाण प्रतिष्ठान, पुणे.